# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन** (Representation) **क्रमांक ४३ / २०२३**

**वीज जोडणी दिनांक व इतर माहिती मिळण्याबाबत**

बाबूराव कृष्णा खांबे ........................................................................................................... अपिलार्थी

विरूध्द

अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड (ए.ई.एम.एल.) ......................................................................... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :-

निवृत्ती भाऊसाहेब ठोसर , प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :-

मुत्यृंजय झा. उपमहाव्यवस्थापक, नोडल अधिकारी
अशोक बागव, विभागिय अधिकारी

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २३ जून २०२३

आदेश पारित दिनांक :- १० जुलै २०२३

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, अदानी इलेक्ट्रिसीटी मुंबई लिमिटेड (मंच) यांच्या दिनांक २४ मार्च २०२३ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १० एप्रिल २०२३ रोजी दाखल केले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai. M.E.R.C.

२.	मंचाने श्री. निवृत्ती भाऊसाहेब ठोसर (खोलीचे सद्याचे मालक) यांचो वीज जोडणी दिनांक व इतर माहिती मिळण्याबाबतची तक्रार (क्रमांक सीजीआरएफ१२०२०/२०२२-२३), दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आली. अपिलार्थी श्री. बाबूराव कृष्णा खांबे यांनी सदर विषयाची तक्रार (क्रमांक सीजीआरएफएमआयएससी ००२/२०२२-२३) दिनाक ९ मार्च २०२३ रोजी मंचाकडे दाखल केली. मंचाने दिनांक २४ मार्च २०२३ च्या आदेशान्वये तक्रार फेटाळली.

३.	अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २३ जून २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी श्री. बाबूराव कृष्णा खांबे (सद्याचा पत्ता हा मुक्काम पोष्ट पाळ, तालूका खेड, जिल्हा पुणे) यांच घर, बी १९३१, प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण संस्था, दत्तात्रय चाळ, इंदिरानगर, घाटकोपर येथे होते. त्यांचा मीटर क्रमांक २२५०८१५ होता. ग्राहक क्र.जी११४२३३५१ असा आहे. प्रतिवादींनी अपिलार्थीना कोणतीही नोटीस न बजावता दिनांक १३ जानेवारी २०१४ रोजी त्यांचा मीटर काढून नेला व वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडीत केला.

- अपिलार्थीने सदर घर अल्पेश अण्णा पाटील यांना विकले, त्यांचा खाते क्रमांक १५१९२६२९५ हा होता, त्यानंतर अल्पेश अण्णा पाटील यांनी ते घर विलास कुंडेकर यांना विकल, त्यावेळी त्यांचा खाते क्रमांक १५२१६८४७२ हा होता. सध्याचे घरमालक निवृत्ती भाऊसाहेब ठोसर यांनी विलास कुंडेकर यांच्याकडून घर विकत घेतले, त्यांचा खाते क्रमांक १५२४९२९९७ असा आहे.

- अपिलार्थीनो नमुद केले की त्यांच्या घराची वीज जोडणी सन १९९३ पासून ते जानेवारी २०१४ पर्यंत होती. सध्याचे घरमालक निवृत्ती भाऊसाहेब ठोसर यांना सरकारी कामसाठी मुळ वीज जोडणीच्या तारीखेची आवश्यकता होती, म्हणून त्यांनी प्रतिवादींकडे वीज जोडणीच्या तारखेच्या मागणी अर्ज केला. महावितरण, टाटा पॉवर सारख्या इतर वितरण कंपण्या वोज जोडणीच्या तारखा वीज देयकावर देतात, परंतू, प्रतिवादी अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड कंपनी का देत नाही? म्हणून अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड कंपनीकडे अर्ज केला. परंतू त्याबाबत कोणतेही सयुंक्तिक उत्तर प्राप्त झाले नाही; म्हणून दिनांक ९ मार्च २०२३ रोजी मंचाकडे अर्ज केला, मंचाने सदर तक्रार

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

'गाऱ्हाणेच्या' व्याख्येत येत नाही. तसेच, तक्रार मुळ घटनेच्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीमध्ये दाखल केली नाही, म्हणून ती फेटाळण्यात आली.

- मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून दिनांक १० एप्रिल २०२३ रोजी माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे तक्रार दाखल केली व अपिलार्थीच्या वीज जोडणीची मुळ तारीख मिळण्याची विनंती त्यांनी आपल्या अर्जात केली आहे.

४. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २३ जून २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी श्री. बाबूराव कृष्णा खांबे हे प्रियदर्शनी सहकारी गृहनिर्माण संस्था, दत्तात्रय चाळ, इंदिरानगर, घाटकोपर येथे त्यावेळच्या वितरण कंपनी रिलायन्स एनर्जी लिमिटेड (अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड) च ग्राहक होते, त्यांचा ग्राहक क्रमांक १०१८२२८३७ (जी११४२३३५१) होता. वीज देयकावर खालीलप्रमाणे पत्ता होता.

  श्री. बाबूराव कृष्णा खांबे,
  दत्तात्रय चाळ, साईनाथ नगर रोड,
  घाटकोपर, मुंबई ४०००८६.

  सदर वीज जोडणी १३ जानेवारी २०१४ रोजी कायम स्वरूपी बंद करण्यात आली असे मागील नोंदीवरून दिसते.

- प्रतिवादींना असे समजते की, त्यानंतर अपिलार्थीने घर अल्पेश अण्णा पाटील यांना विकले, त्यानंतर अल्पेश अण्णा पाटील यांनी ते विलास कुंडेकर यांना विकल व सध्याचे घरमालक निवृत्ती भाऊसाहेब ठोसर यांनी ते विलास कुंडेकर यांच्याकडून विकत घेतले, त्यांचा खाते क्रमांक १५२४९२९९७ असा आहे.

- श्री. निवृत्ती भाऊसाहेब ठोसर यांनी दिनांक २० डिसेंबर २०२२ रोजी मंचाकडे अपिलार्थीच्या वीज देयकाबाबतच्या काही माहितीसाठी अर्ज केला, तो मंचाने १६ फेब्रुवारी २०२३ च्या आदेशान्वये

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai. M.E.R.C.

फेटाळला. त्यानंतर अपिलार्थींनी त्याच विषयावर दिनांक ९ मार्च २०२३ रोजी अर्ज केला व त्यांच्या घराच्या वीज जोडणी दिलेल्या तारखेची माहिती देण्याची विनंती केली. मंचाने दिनांक २४ मार्च २०२३ च्या आदेशान्वये तक्रार फेटाळली. सदर तक्रार 'गाऱ्हाणेच्या' व्याख्येत येत नाही. शिवाय, सदर तक्रार ही तक्रार उदभवलेच्या मुळ घटनेच्या तारखेपासून दोन वर्षाच्या आतील कालावधीमध्ये दाखल केलेली नाही, असे निरिक्षण मंचाने आदेशामध्ये केले आहे.

- अपिलार्थी हे २०१४ पासून जागेचे मालक नाहीत, वा त्याच्या नावे वीज जोडणी नाही, त्यामुळे अपिलार्थी प्रतिवादीचा ग्राहक असल्याचा दावा करू शकत नाहीत; सबब, त्यांना वीज कायदा २००३ अंतर्गत कोणतीही माहिती मिळविण्याचा अधिकार त्यांना नाही. वीज कायदा २००३ च्या कलम २(१५) अंतर्गत 'गाऱ्हाणेची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

    *'गाऱ्हाणे' म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाने, परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरूप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा;*

    तसेच वोज अधिनियम कायदा, २००३ मधील खंड १, कलम १५ नुसार 'ग्राहकाची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

    *"'ग्राहक' याचा अर्थ असा की, या कायद्यानुसार अथवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमानुसार ज्या इसमास त्याच्या स्वतःच्या वापराकरीता एखाद्या परवानाधारकाकडुन अथवा सरकारकडून अथवा जनतेस वीज पुरवठा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर कोणत्याही इसमाकडुन वीज पुरवढा करण्यात येतो अशी कोणतीही इसम, असा आहे व ज्या इसमाची परिवास्तू / जागा, एखाद्या परवानाधारकाच्या सरकारच्या अथवा यथास्थिती, अशा इतर इसमाच्या कामासह वीज मिळण्याच्या प्रयोजनाकरीता त्या त्या वेळी, संबधीत असेल अशा कोणत्याही इसमाचा समावेश होतो."*

वरील विवेचनावरून असे सिध्द होते की, अपिलार्थी हे प्रतिवादींचे 'ग्राहक' नाहीत व त्यांनी तक्रारीत मागितलेली माहिती गाऱ्हाणेच्या व्याख्येत बसत नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थीने सादर केलेले अर्ज व वितरण परवानाधारक यांच्यातील करार हा वापरकर्त्याचा पुरवठा कायमस्वरूपी खंडीत केल्यावर किंवा ग्राहक सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी डिस्कनक्ट राहिल्यावर तो करार संपुष्टात येतो. अपिलकर्त्याची वीज जोडणी ही २०१४ साली कायमस्वरूपी खंडीत झाली असल्याने, तो करार संपुष्टात आलेला आहे. याबाबत नियम असेही सांगतो.

> *"७ 'करार'*
> *७.१ अर्जदाराने सादर केलेला अर्ज हा ग्राहक आणि वितरण परवानाधारक यांच्यात करण्यात आलेला एक करार असेल;*
> *परंतू असे की, परवानाधारक अर्जाच्या नमुन्यामध्ये अटी व शर्ती समाविष्ट करील आणि असे खंड अधिनियमातील आणि अंमलात असलेल्या अन्य नियम आणि विनियमांतील तरतुदींचा भंग करणार नाही."*

- अपिलकर्ता हा या प्रतिवादीचा 'ग्राहक' नाही व त्यांनी दाखल केलेले 'अभिवेदन' गाऱ्हाण्याच्या व्याख्येत बसत नाही, म्हणून अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे ही विनंती.

## विश्लेषण व निर्णय

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थीनी व प्रतिवादींनी अभिवेदनात नमुद केलेले मुद्दे सुनावणी दरम्यान पुनश्चः उपस्थित केले. उपलब्ध माहितीवरून असे दिसते की, अपिलार्थी हे त्यावेळच्या 'रिलायन्स एनर्जी लिमिटेड' (अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लिमिटेड) चे ग्राहक होते, त्यांचा ग्राहक क्रमांक १०१८२२८३७ (जी११४२३३५१) होता. वीज देयकावर खालीलप्रमाणे पत्ता होता.

श्री. बाबूराव कृष्णा खांबे,
दत्तात्रय चाळ, साईनाथ नगर रोड,
घाटकोपर, मुंबई ४०००८६.

सदर वीज जोडणी १३ जानेवारी २०१४ रोजी कायमस्वरूपी बंद करण्यात आली असे दिसते.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

६.	अपिलार्थी हे प्रतिवादीचे दिनांक १३ जानेवारी २०१४ पासून ग्राहक नाहीत. तसेच ग्राहकाने मागितलेली माहिती ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल, विनियम २००६ / २०२० मधील कलम २.३ नुसार 'गाऱ्हाणेची' व्याख्या खालीलप्रमाणेः-

> *"'गाऱ्हाणे' म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाने,परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरूप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; ज्यात इतर बाबींबरोबरच (अ) जीवाला किंवा मालमत्तेला धोका ठरू शकणाऱ्या वितरण यंत्रणेची सुरक्षितता आणि (ब) आयोगाच्या कोणत्याही आदेशाचे पालन न करने किंवा त्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कार्यवाही, जी मंच किंवा विद्युत लोकपालांच्या जसे असेल तसे, अधिकारक्षेत्रात येत असेल, त्याबाबतचे गाऱ्हाणे, यांचा समावेश होतो."*

अपिलार्थीच्या वीज जोडणीची मुळ तारीख मिळण्याची विनंती त्यांनी आपल्या अर्जात केली आहे. सदर मागणी 'गाऱ्हाणेच्या' व्याख्यत बसत नाही. तसेच सदर गाऱ्हाणे कारवाईचे कारण उद्भवलेल्या दिनांकापासून (जानेवारी २०१४) दोन वर्षात तक्रार मंचाकडे दाखल केल. सबब, ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल, विनियम २००६ / २०२० मधील कलम ६.६ / ७.८ नुसार ते कालबाह्य आहे. वरील सर्व बाबींचा एकत्रित उहापोह करता, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत आहे.

७.	अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai